# वाढदिवस

जोशूच्या वर्गातील एका मुलाचा वाढदिवस होता,
त्याने वर्गात बिस्किटे वाटली; शिक्षकांनाही दिली.
अधून मधून कुणाचा तरी वाढदिवस असायचा,
असेच काहीतरी तो वर्गात, शाळेत वाटायचा.

जोशूला, खरं तर, हे आवडायचेच नाही
मनातच तो म्हणायचा, असे करणे बरे नाही !
घरच्यांशी तो हिरिरीने वाद घालत बसायचा.
सक्तीनेच काही वाटण्याचा त्याला राग यायचा.

जोशूच्या वाढदिवसाला त्याने आधीच घरी बजावले,
जे काही आणले होते, ते शाळेत नाहीच वाटले.
रस्त्यात पतंग बनवणाऱ्या मुलांना घरी बोलावले
शाळेला चक्क दांडी मारून, त्यांनाच खूप खाऊ घातले.

जोशू आता वाढला होता, वाढदिवस झाला होता.
जोशू तर बदलला होता, मनातून मोठा झाला होता !